क्र.पोमसं/९/NGO/गोपनीय अहवाल/२०१६-१७/६५/२०१७
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई - ४०० ००१
दिनांक ०५ /०४/२०१७

**संदर्भ** : शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दि.०१/११/२०११

**विषय** : शासकीय अधिकारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करण्याबाबत

*****

संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयाव्दारे वार्षिक गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करण्याच्या कार्यपध्दतीबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार प्रतिवेदन अधिकाऱ्याने गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करुन १५ एप्रिल पर्यत पुनर्विलोकन अधिकाऱ्यांकडे पाठवावे व पुनर्विलोकन अधिकाऱ्यांनी सदरचे गोपनीय अहवाल पुनर्विलोकन करुन दिनांक ३० एप्रिलपर्यंत संस्करण अधिकाऱ्यांकडे पाठवावे अशी तरतूद विहित केली आहे.

२. **जे प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकारी कालमर्यादेच्या बंधनात गोपनीय अहवालांचे प्रतिवेदन व पुनर्विलोकन १०० % पुर्ण करणार नाहीत अशा अधिकाऱ्यांना दि.०१ जुलै रोजी देय होणारी वार्षिक वेतनवाढ असे काम पुर्णकरण्याच्या दिनांकापर्यंत मंजुर करण्यात येवू नये, असे शासनाचे आदेश आहेत.** अशाप्रकारचा अप्रिय निर्णय घेण्याची वेळ येऊ नये याची दक्षता घेवून सर्व प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकाऱ्यांनी सन २०१६-१७ चे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत व पुनर्विलोकीत करण्याची कामगिरी कोणत्याही परिस्थितीत विहित कालमर्यादेतच पूर्ण करावी. तसेच, गोपनीय अहवाल प्रतिवेदन / पुनर्विलोकनासाठी शिल्लक नसल्याबाबतचे कार्यपुर्ती प्रमाणपत्र गोपनीय अहवालांसहित या कार्यालयास पाठवावेत.

३. तसेच सन २०१६-१७ चे गोपनीय अहवाल जतन करण्यासाठी या कार्यालयास पाठवतांना, सर्व गोपनीय अहवाल संगणकीकृत करण्यासाठी गोपनीय अहवाल आणि त्याबाबतच्या माहितीचे विवरणपत्र (प्रत संलग्न) स्कॅनिंग करुन पेन ड्राईव्ह मध्ये (Soft Copy) खास दूतामार्फत या कार्यालयास पाठवावेत.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरिक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त,
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म. राज्य, मुंबई
संचालक व अपर पोलीस महासंचालक, पोलीस बिनतारी संदेश, म. राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, म. रा. मुंबई / लोहमार्ग, म. रा. मुंबई /
प्रशिक्षण व खास पथके, म. रा. मुंबई / वाहतुक, म. रा. मुंबई / रा. रा. पो. बल,
म. रा. मुंबई / दहशतवाद विरोधी पथक, म. रा., मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक (परिक्षेत्रीय / महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य,
मुंबई / मोटार परिवहन पुणे / रा.रा.पो.बल पुणे / नागपूर / महाराष्ट्र गुप्तवार्ता
प्रबोधिनी, वडाची वाडी, पुणे / न. वि. अ. नागपूर / फोर्स वन)
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा / रेल्वे / बिनतारी संदेश)
सर्व समादेशक, रा. रा. पो. बल गट १ ते १५
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये
प्राचार्य, गु. अ. प्र. वि. नाशिक
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर

प्रत सस्नेह अग्रेषित :-

महासंचालक, अे. सी. बी., महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना माहितीकरीता

प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष,

२. यांनी सदर परिपत्रक १ महिन्याकरीता पोलीस महासंचालक यांचे संकेत स्थळावर उपलब्ध करून द्यावे.

## प्रतिवेदन अधिका-यांने कार्यपूर्ती प्रमाणपत्रासोबत दयावयाची माहिती

कार्यासन क्रमांक :-

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचा-यांचे नाव | पदनाम | कालावधी | प्रतिवेदन अधिकारी व कालावधी | पुनर्विलोकन अधिकारी व कालावधी | गोपनीय अहवाल / प्रमाणपत्र | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | | |
| २. | | | | | | | |
| ३. | | | | | | | |
| ४. | | | | | | | |
| ५. | | | | | | | |
| ६. | | | | | | | |
| ७. | | | | | | | |

प्रतिवेदन अधिकारी स्वाक्षरी

पुनर्विलोकन अधिकारी प्रति स्वाक्षरी